# जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालय
## शाखा:-अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, सोलापूर

दूरध्वनी व फॅक्स क्रं-०२१७-२७३१०००८

---

क्रं.अधावि/कार्या-२७/प्रशा-१/आरआर/274/२०१५ दि.०६/११/२०१५

**स्पीड पोस्ट**

प्रति,

परिमंडळ अधिकारी,
अ,ब,क,ड विभाग, सोलापूर

.

**विषय-माहे ऑक्टोंबर-२०१५ चे नियतन म्हणून श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि.दहिटणे, ता.अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर (कारखाना कोड क्रं.३९९०१) या साखर कारखान्याकडून हंगाम २०११-१२ च्या ३९७ क्विंटल साखरेची उचल करणेबाबत.**

**संदर्भ:-१)**मा.अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्रं.साखर-१११५/GOI-४६/प्र.क्र.१०७, नापू-१९ दि. २२ सप्टेंबर-२०१५ रोजीचे पत्र.
२) या कार्यालयाचे पत्र क्रं.अधावि/कार्या-२७/प्रशा-१/आरआर/०२३०/२०१५, दि.२४.०९.२०१५ रोजीचे पत्र.
३) या कार्यालयाचे पत्र क्रं.अधावि/कार्या-२७/प्रशा-१/आरआर/०२५८/२०१५, दि.२३.१०.२०१५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविणेत येते की, माहे ऑक्टोंबर-२०१५ चे नियतन म्हणून श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि.दहिटणे, ता.अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर (कारखाना कोड क्रं.३९९०१) या साखर कारखान्याकडून हंगाम २०११-१२ च्या ३९७ क्विंटल साखरेचे नियतन मा.अवर सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्रं.१ चे पत्रान्वये इकडील कार्यालयास प्राप्त झालेले होते.

त्याअनुषंगाने सदरची साखर कार्डधारकांना वाटप करणेकामी तात्काळ उपलब्ध होऊन मिळणेकामी या कार्यालयाकडील उपरोक्त संदर्भ क्रं.२ चे पत्रान्वये कार्यकारी संचालक, श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि.दहिटणे, ता.अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर यांना कळविणेत आलेले होते. तथापि, सदरची नियंत्रित साखर कार्यकारी संचालक, श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि.दहिटणे, ता.अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर यांचेकडून उपलब्ध करुन देणेस असमर्थता दर्शविल्यामुळे सोलापूर शहराकरिता माहे ऑक्टोंबर-२०१५ ची साखर कार्डधारकांना उपलब्ध होऊ शकली नाही. तसेच सदरच्या वस्तुस्थितीबाबत मा.अवर सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाकडील उपरोक्त संदर्भ क्रं.३ चे पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केला आहे.

अन्नधान्य वितरण अधिकारी
सोलापूर